# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**०८) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि२८.०३.२०२५**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (२१/०३/२०२५ ते २७/०३/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२९/०३/२०२५ ते ०२/०४/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | दिनांक | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | १२ | ५ |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ४० | ४१ | ४० | ३९ | ३८ |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २१ | २२ | २४ | २५ | २४ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | २ | ५ | ५ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४८ | ४९ | ५० | ४९ | ५० |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४१ | ४२ | ४१ | ४२ | ४१ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ९ | ६ | ५ | ७ | ४ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार दिनांक १ आणि २ एप्रिल रोजी आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे व काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | मातीतील ओलावा वाचवण्यासाठी अच्छादनाचा वापर करावा , त्याकरीता गवताचा/ पिकाचे अवशेष/ पॉलिथीनचा उपयोग करावा. |
| रब्बी पिकांची काढणी | काढणी | रब्बी पिकांची काढणी झालेल्या क्षेत्रात लगेच नांगरणी करावी म्हणजेच शेतातील पिकांचा पालापाचोळा अवशेष इ. जमिनीत गाडले जातात. |
| काढणी केलेली पिके | साठवणूक | साठवण करावयाच्या कडधान्यांचे किडीपासून संरक्षण करण्यासाठी एरंडेल / जवस / करंज / कडुनिंबाचे तेल @ ३ - ५ मिलि प्रति किलो धान्य या प्रमाणात वापरावे.<br>साठवायचे बियाणे साठवणीतील धान्यांचे किड्यांपासून संरक्षण करण्यासाठी , कापणी केलेल्या पिकांच्या धान्यमधे ११-१२%, कडधान्ये ९%, तेलबिया ८% आणि भाजीपाला बियाणे ५-६% इतका ओलावा राहील , अशा पद्धतीने बियाणे वाळवावेत. |
| उन्हाळी भुईमूग | आऱ्या लागणे | ४५ व ५५ दिवसांनी २०० लिटर पाण्याचा मोकळा ड्रम पिकावरून दोनदा फिरवावा म्हणजे सगळया आऱ्या जमिनीत घुसतात आणि त्यांना शेंगा लागतात. |
| टोमॅटो/ मिरची | | फळ पोखरणाऱ्या अळीचे पतंग मोठ्या प्रमाणावर पकडून नष्ट करण्यासाठी लागवड केल्यानंतर २० दिवसांनी १६ कामगंध सापळे प्रति एकरी शेतात उभारावेत. |
| आंबा | | खोड किडीचे नियंत्रण करण्यासाठी , खोडावरील अळीचे छिद्रे शोधून लोखंडी तारेच्या सहाय्याने आतील अळी मारावी. त्यानंतर क्लोरपायरीफॉस २० ईसी @ २५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून छिद्रात ओतावे व छिद्रे चिखलाने बंद करावे. |
| वांगी | | अंकुर आणि फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरपायरीफॉस २० ईसी @ २० मिली किंवा एमॅमेक्टिन बेंझोएट ५ एसजी @ ३ ग्रॅम किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५ एससी @ ३ मिली किंवा सायपरमेथ्रिन १० ईसी @ २० मिली किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रिन ५ ईसी @ १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| चिकू | | कळी आणि फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा-सायहॅलोथ्रिन ५ ईसी @ १० मिली किंवा प्रोफेनोफोस ४०% + सायपरमेथ्रिन ४% ईसी (४४ ईसी) @ २० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| फळ पिके | | वाढत्या तापमानामुळे फळ पिकांमध्ये पाण्याचा ताण पडतो , त्यामुळे कोळी किडीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास कृषी तज्ञाच्या सल्याने किटकनाशकाची फवारणी करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **भाजीपाला पिके** | | वाढत्या तापमानामुळे भाजीपाला पिकांमध्ये पाण्याचा ताण पडतो , त्यामुळे लाल कोळी, पांढरी माशी किवा तुडतुडे यांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते . किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास कृषी तज्ञाच्या सल्याने किटकनाशकाची फवारणी करावी. |
| **पशुसंवर्धन** | | वाढत्या तापमाच्या अनुषंगाने जनावरांना सावलीत बांधावे आणि पिण्यास भरपूर स्वच्छ आणि थंड पाणी द्यावे. जनावरांकडून सकाळी १२ ते दुपारी ३ वाजेच्या दरम्यान काम करू घेवु नये.<br>हिरवे गवत, प्रथिनेयुक्त, खनिज मिश्रण आणि मीठयुक्त खाद्य द्यावे.<br>जनावरे सकाळी किवा सायंकाळी चरावयास न्यावे.<br>तापमान कमी करण्यासाठी शेडचे छत पेंढ्याने झा कावे तसेच भिंतींना पांढरे रंग द्या वा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |
| **कुक्कुटपालन** | | वाढत्या तापमाच्या अनुषंगाने पोल्ट्री हाऊसमध्ये पडदे लावावेत आणि हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. तसेच भिंतींना पांढरे रंग द्यावा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.

दि. : २८.०३.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**